# येशूला एक स्त्री विहिरीवर भेटली

## साक्ष देण्यास नेहमी तयार असा हे मुलांना शिकवा

*मुलांच्या गरजा आणि स्थानिक रिवाज ह्यांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम यामधून निवडा.*

### शोमरोनी स्त्री

**मोठ्या मुलाने किंवा शिक्षकाने** *योहान ४:४-४२ ह्या शास्त्रभागातून शोमरोनी स्त्रीचा वृत्तांत* **वाचावा** *किंवा सांगावा, येशू त्याला भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीला देवाची प्रीती, पापक्षमा आणि सार्वकालिक जीवनाची सुवार्ता कशी तत्परतेने सांगत असे हे यावरून समजते.*



**शक्य असल्यास मुलांना हे चित्र काढू दया किंवा रंगवायला द्या.**

**पश्च.** *वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा, प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तरे दिली आहे.*

- *येशू विहिरीवर काय करीत होता? (पाहा वचन ६)*
- *येशूने पिण्यासाठी पाणी मागितल्यावर त्या स्त्रीला आश्चर्य का वाटाले? (पाहा वचन ९)*
- *येशू त्या स्त्रीला कशा प्रकारचे पाणी देत होता? (वचन १४)*
- *देवाची उपासना लोकांनी एखाद्या खास जागीच केली पाहिजे, असे काही आहे का? (पाहा वचने २१ व २४)*
- *येशू कोण आहे असे त्याने सांगितले? (पाहा वचन २६)*
- *शेते कापणीसाठी तयार झाली आहेत, हया येशूच्या म्हण्याचा अर्थ कार्य? (उत्तरः येशूच्या सुवार्तेला प्रतिसाद देण्यास अनेक लोग तयार आहेत, पण त्याआधी प्रथम आपण त्यांना ती सुवार्ता सांगणे आवश्यक आहे.)*

*हया वृत्तांताच्या भागांचे नाट्यीकरण करा. ही छोटीशी नाटिका सादर करण्यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून वेळ ठरवा, मुलांकडून नाटकाची तयारी करून घेण्यासाठी वेळ दया. तुम्ही सर्व भागांचा वापर केलाच पाहिजे असे नाही.*

- **मोठया मुलांना** *किंवा प्रौढाना पुढील भूमिका साकारू दया.*

**निवेदक.** *वृत्तांताचा सारांश सांगून मुलांना त्यांचे संवाद लक्षात ठेवण्यास मदत करतो.*

**येशू,** *विहिरीसारख्या दिसणाऱ्या गोष्टीपाशी बसतो.*

**शोमरोनी स्त्री.** *हिने हातात घागर धरलेली आहे.*

**लहान मुलांना** *पुढील भूमिका दयाः*

*हातात अन्न घेतलेले* **शिष्य**

**शोमरोनी लोक**

**येशू:** *'विहिरीजवळ' बसा.*

**निवेदक:** *योहान ४:९-२६ ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा पहिला माग सांगा आणि भग म्हणा. ''शिष्यांचे काय बोलणे चालू आहे ते ऐका.''*

**शिष्य:** *''येशू, तुम्ही थकला आहात, प्रवास बराच लांबचा होता. येथे विहिरीजवळ बसून आराम करा. आम्ही शोभरोन गावात जाऊन जेवणाची काही व्यवस्था पहातो.''*

**शोमरोनी स्त्री:** *हातात घागर घेऊन येशूच्या दिशेने चालत या.*

**येशू:** *''मला थोडे प्यायला पाणी द्याल का.''*

**शोमरोनी स्त्री:** *आश्‍चर्यचकित झाल्याचा अभिनय करा. म्हणा, ''तुम्हीं तर यहूदी दिसता. मग माझ्यासारख्या शोमरोनी स्त्री कडे पाणी प्यायला मागता हे कसे?''*

**येशू:** *''मी तुला कधीही तहान लागणार नाही असे जिवंत पाणी प्यायला देईन.''*

**शोमरोनी स्त्री:** *आश्‍चर्यचकित झाल्याचा अभिनय करीत म्हणा. ''कसे काय तुम्ही देणार?''*

**येशू:** *''मी मसीहा, देवाचा निवडलेला असा आहे.''*

**निवदेक:** *योहान. ४:२७-३८ ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा दुसरा भाग सांगा. आणि मग म्हणा. ''शिष्य काय म्हणतात ते ऐका.''*

**शिष्य:** *''ते बघा! येशू बरोबर ती स्त्री कोण आहे? ती आपली घागर तिथेयेच टाकून गावात परत निघाली आहे! ती मोठया आनंदात दिसत आहे! हं, येशू हे घ्या जेवण.''*

**येशू:** *''माझ्याकडे वेगळ्या प्रकारचे अन्न आहे. लोकांना देवाची ओळख करून देणे हेच माझे अन्न होय. लोकांना सुवार्ता सांगण्यास नेहमी तयार असा.''*

**निवेदक:** *योहना ४:३९-४२ ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा, ''शोमरोनी स्त्री काय म्हणते ते ऐका.''*

**शोमरोनी स्त्री:** *एका बाजूला उभ्या असलेल्या शोमरोनी लोकांना सांगा, ''या या हा मनुष्य बघा. मी केलेली प्रत्येक गोष्ट याने मला सांगितली. हाच देवाचा निवडलेला असेल का?''*

**शोमरोनी लोक:** *''चला कोण मनुष्य आहेते पाहू या'' ''आपणही त्याच्यावर विश्वास ठेवू.''*

**निवेदक:** *नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.*

*मुलांनी ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठ्या माणसांना विचारावेत. निवेदकाने असेही विचारावे. ''आमची अपेक्षा नसतानाही लोकांनी येशूला प्रतिसाद दिला याची इतर काही उदाहरणे आहेत का?'' (लोकांना उदाहरणे सांगू द्या).*



**विहिरीचे चित्र काढा.** *मुलांना ते काढू दया. पुढच्या उपासनेच्या वेळी मुले हे चित्र मोठ्या माणसांना दाखवून त्याची माहिती सांगतील. देवाने जिवंत पाणी घेण्यास तयार असणाऱ्या कोणासही ते देण्यास आम्ही नेहमी तयार असावे हे यावरून स्पष्ट होते.*

**पाठ करा** *कलस्सै. ४:३*

**कविता म्हणा:** *स्तोत्र १९:१-४ ह्या शास्त्रभागातून चार मुलांना प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा. हिच वचने त्यांना मोठ्या माणसांसमोरही म्हणता येतील.*

**प्रार्थना:** *प्रिय प्रभू, आम्हांला कोठेही तुझी उपासना करता येते याचा आनंद वाटतो, तू सर्व भाषांच्या व संस्कृतीच्या लोकांवर प्रीती करतो. तू सर्व राष्ट्रांतील लोकांना सुवार्ता सांगण्यास आम्हांला पाठवले म्हणून आम्ही तुझे आभार मानतो. आमच्या आजूबाजूचे लोक तुझ्या सुवार्तेला प्रतिसाद देण्यास तयार आहेत हे कायम आमच्या लक्षात राहू दे. त्यांनी आम्ही प्रामाणिकपणे सुवार्ता सांगावी यासाठी आमचे सहाय्य कर.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net